# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः27.11.2024** **वारःबुधवार**

---

1. नागरिकांनी राज्यघटनेतील मूल्यांचा अंगीकार करून आपली मूलभूत कर्तव्य पार पाडावीत-राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं आवाहन
2. भारतीय संविधान देशाच्या वर्तमान आणि भविष्यासाठी दीपस्तंभाप्रमाणे कार्य करत असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
3. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा राजीनामा राज्यपालांना सुपूर्द; नवीन सरकार स्थापनेपर्यंत काळजीवाहू मुख्यमंत्री म्हणून काम पाहणार
4. 38 वी पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन येत्या 1 डिसेंबरला; देशपरदेशातल्या सुमारे आठ हजार धावपटूंचा सहभाग आणि
5. राज्याच्या विविध भागांमध्ये पारा घसरला

**राष्ट्रपती**

प्रत्येक नागरिकाने भारतीय राज्यघटनेतील आदर्श मूल्यांचा अंगीकार करून आपली मूलभूत कर्तव्य पार पाडावीत आणि विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी कार्यरत राहावं, असं आवाहन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं. संविधान दिनानिमित्त नवी दिल्लीत संविधान सदनाच्या सेंट्रल हॉलमध्ये आयोजित भव्य कार्यक्रमाला त्या संबोधित करत होत्या. आपलं संविधान म्हणजे एक जिवंत आणि प्रगतीशील दस्तऐवज आहे; त्याद्वारे देश सामाजिक न्याय आणि सर्वसमावेशक विकासाची उद्दिष्ट साध्य करत आहे, असं राष्ट्रपती म्हणाल्या. उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनीही यावेळी आपले विचार मांडले. लोकसभेचे सभापती ओम बिर्ला, पंतप्रधान नरेंद्र मोदी, संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू, लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी, राज्यसभेचे विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे यांच्यासह अन्य मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित होते. यावेळी संविधानाच्या उद्देशिकेचं सामूहिक वाचन करण्यात आलं. संविधान स्वीकृतीच्या अमृत महोत्सवानिमित्त काढलेल्या 75 रुपयांच्या नाण्याचं, तसंच टपाल तिकिटाचं अनावरण राष्ट्रपतींच्या हस्ते झालं. संविधानाच्या निर्मितीचा इतिहास आणि प्रक्रिया उलगडून दाखवणाऱ्या दोन पुस्तकांचं अनावरणही यावेळी झालं. तसंच संविधानाच्या संस्कृत आणि मैथिली भाषेतल्या प्रती यावेळी प्रकाशित करण्यात आल्या.

**संविधान दिन**

भारतीय संविधान दिन काल देशभरात सर्वत्र साजरा करण्यात आला. 75 वर्षांपूर्वी 26 नोव्हेंबर रोजी भारत सरकारनं राज्यघटनेचा स्वीकार केला होता. त्यानिमित्त पुढील वर्षभर 'हमारा संविधान हमारा स्वाभिमान' या उपक्रमाचं आयोजन केलं जाणार आहे.

**पंतप्रधान सर्वोच्च न्यायालय**

भारतीय संविधान देशाच्या वर्तमान आणि भविष्यासाठी दीपस्तंभाप्रमाणे कार्य करत आहे, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. संविधान दिनानिमित्त सर्वोच्च न्यायालयात आयोजित कार्यक्रमात ते काल बोलत होते. 26/11च्या मुंबई दहशतवादी हल्ल्याचा स्मृतीदिन काल होता; या हल्ल्यातील हुतात्म्यांना पंतप्रधानांनी श्रद्धांजली अर्पण केली. देशाच्या सुरक्षेला आव्हान देणाऱ्या कुठल्याही दहशतवादी संघटनांना जशास तसं उत्तर दिलं जाईल, असं ठाम प्रतिपादन पंतप्रधानांनी यावेळी

केलं. देशाचा विकास होत असताना नागरिकांच्या आशा-आकांक्षा, आव्हानं, बदलत जातील, याचा विचार करून संविधानाच्या निर्मात्यांनी अत्यंत प्रवाही असं संविधान निर्माण केलं, असं मोदी म्हणाले....

**देश-काल-परिस्थिति के हिसाब से उचित निर्णय लेकर हम संविधान की समय-समय पर व्याख्या कर सकें, ये प्रावधान हमारे संविधान निर्माताओं ने हमें दिया है। हमारे संविधान निर्माता ये जानते थे कि भारत की आकांक्षाएं, भारत के सपने समय के साथ नई ऊंचाई पर पहुंचेंगे, वो जानते थे कि आज़ाद भारत की और भारत के नागरिकों की ज़रूरतें बदलेंगी, चुनौतियां बदलेंगी। इसलिए उन्होंने हमारे संविधान को महज़ कानून की एक किताब बनाकर नहीं छोड़ा...बल्कि इसको एक जीवंत, निरंतर प्रवाहमान धारा बनाया। साथियों, हमारा संविधान हमारे वर्तमान और भविष्य का मार्गदर्शक है। बीते 75 वर्षों में देश के सामने जो भी चुनौतियां आई हैं, हमारे संविधान ने हर उस चुनौती का समाधान करने के लिए उचित मार्ग दिखाया है।**

सरन्यायाधीश न्यायमूर्ती संजीव खन्ना यांनी यावेळी न्यायपालिकेत केल्या जात असलेल्या सुधारणांची माहिती दिली.

**<u>राज्य संविधान</u>**

राज्यातही संविधान दिनानिमित्त अनेक उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी राजभवन इथं अधिकारी, कर्मचारी तसंच पोलिसांसमवेत राज्यघटनेच्या उद्देशिकेचं वाचन केलं. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंत्रालयात संविधानाच्या उद्देशिकेचं वाचन केलं. मुंबईत काँग्रेसच्या मुख्यालयातही संविधान दिनानिमित्त संविधानाच्या उद्देशिकेचं सामूहिक वाचन करण्यात आलं. विविध सरकारी कार्यालयं, शासकीय संस्था, शाळा आणि महाविद्यालयांमधूनही काल राज्यघटनेच्या उद्देशिकेचं वाचन करण्यात आलं. त्याचबरोबर संविधान फेरी, पदयात्रा आणि अन्य प्रबोधनपर कार्यक्रमांचं आयोजनही करण्यात आलं होतं. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीनं भारतीय संविधानावर आधारित प्रबोधनात्मक गीतांचा कार्यक्रम आणि सन्मान संविधानाचा या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन, विद्यार्थी विकास मंडळ आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने विद्यापीठात संविधान दिन विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. विद्यापीठातील संविधान स्तंभाजवळ कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, यांच्यासह विद्यापीठातील अनेक मान्यवर अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत संविधान उद्देशिकेचं वाचन करण्यात आलं. त्यानंतर विद्यापीठामध्ये संविधान जनजागृतीसाठी फेरी काढण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी पथनाट्ये सादर केली. संविधानाचे अभ्यासक आणि कायदा आयोगाचे सदस्य डॉ. डी. एन. संदानशिव यांनी 'डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना' या विषयावर उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केलं.

**<u>काळजीवाहू सरकार</u>**

14व्या विधानसभेचा कार्यकाळ संपुष्टात आल्यानं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्याकडे मुख्यमंत्री पदाचा राजीनामा सुपूर्द केला. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह मंत्री दादा भुसे, दीपक केसरकर उपस्थित होते. आता नवनिर्वाचित आमदारांची 15वी विधानसभा गठित करण्याची आणि नव्या सरकारच्या स्थापनेची प्रक्रिया सुरू होईल. नवीन सरकार स्थापन होईपर्यंत काळजीवाहू मुख्यमंत्री म्हणून काम पहावं, असं राज्यपालांनी एकनाथ शिंदे यांना सांगितलं. दरम्यान राज्यात सत्तास्थापनेच्या हालचाली वेगवान झाल्या असल्या तरी अजून नवीन सरकार स्थापनेबाबत निर्णय झालेला नाही.

**<u>26/11</u>**

26/11 च्या मुंबई दहशतवादी हल्ल्याला काल 16 वर्षे पूर्ण झाली. या हल्ल्यात हुतात्मा झालेल्या पोलिस जवानांना काल राज्यभरात सर्वत्र आदरांजली अर्पण करण्यात आली. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मुंबई पोलीस मुख्यालयातील पोलीस स्मारकावर पुष्पचक्र

वाहून हुतात्म्यांना आदरांजली अर्पण केली. यावेळी पोलीस अधिकारी आणि जवानांनी हुतात्म्यांना सलामी देत अभिवादन केले. राज्यपालांनी हुतात्मा पोलीसांच्या कुटुंबातील सदस्यांची तसेच उपस्थित आजी-माजी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची भेट घेतली.

**रश्मी शुक्ला**

राज्याच्या पोलीस महासंचालकपदी रश्मी शुक्ला यांची पुनर्नियुक्ती झाली आहे. शुक्ला यांना पदावरुन हटवण्याची मागणी काँग्रेसनं केली होती. निवडणूक आयोगाच्या निर्देशांनुसार निवडणूक काळात शुक्ला यांना सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आलं होतं आणि त्यांच्या जागी संजयकुमार वर्मा यांची नेमणूक झाली होती. आता निवडणूक प्रक्रिया संपल्यानंतर शुक्ला यांना पुन्हा नियुक्त करण्याचा आदेश गृहमंत्रालयानं काल काढला आहे.

**पुणे मॅरथॉन**

पुण्याच्या क्रीडा क्षेत्रात मानाची समजली जाणारी  पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धा दरवर्षीप्रमाणे यंदाही डिसेंबरच्या पहिल्या रविवारी म्हणजेच एक डिसेंबर रोजी होणार आहे. स्पर्धेचं यंदाचं हे 38 वं वर्ष आहे. विजेत्यांना पुणे महापालिकेकडून 35 लाख रुपयांची पारितोषिके देण्यात येणार आहे. ऐकूया याविषयीची अधिक माहिती आमच्या प्रतिनिधिकडून.....

**दरवर्षीप्रमाणे यंदाही पुरुष आणि महिला गटाच्या पूर्ण आणि अर्ध मॅरेथॉन स्पर्धा सणस मैदानावर पहाटे तीन वाजता सुरू होईल. याशिवाय दहा सात आणि तीन किलोमीटर तसेच व्हीलचेअर मॅरेथॉन स्पर्धा सकाळी साडेसहा पासून सुरू होतील. या स्पर्धेत यंदा देशभरातून जवळपास आठ हजार धावपटूंनी सहभाग नोंदवला आहे तर इथिओपिया, केनिया, टांझानिया यासह अनेक देशातील सत्तर परदेशी धावपटू सहभागी होत आहेत. सणस मैदान, दांडेकर चौक, सिंहगड रस्ता, विठ्ठलवाडी, नांदेड सिटी मार्गे पूर्ण मॅरेथॉन स्पर्धा अशा दोन फेऱ्या पूर्ण करतील. स्पर्धेच्या मार्गावर वैद्यकीय सुविधा पाण्याची व्यवस्था फळे स्पंजिंग सुविधा खेळाडूंसाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे धावपटूंना मार्गदर्शन करण्यासाठी सायकल पायलेट सही तैनात करण्यात येणार आहे. यंदाच्या स्पर्धेचं वैशिष्ट्य म्हणजे स्पर्धेमध्ये दिली जाणारी स्मृतीचिन्हे ही बांबू पासून आणि कचऱ्याचा पुनर्वापर करून बनवण्यात आली आहेत. यंदा प्रथमच तब्बल 70 ते 75 भारतीय महिला पूर्ण मॅरेथॉन धावणार आहेत. गेल्या काही दिवसापासून शहरात थंडीचा कडाका वाढत असल्याने याचा फायदा धावपटूंना कसा होईल हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी सीमा चोरडिया, पुणे**

**हवामान**

राज्याच्या विविध भागांमध्ये पारा घसरुन 10 ते 12 अंश सेल्सियसच्या दरम्यान आला आहे. अहमदनगर इथं सर्वात कमी 9 पूर्णांक 7 अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. किमान तापमानात आणखी घट संभवते असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.